**FIRST YEAR DIPLOMA ADMISSION PREOCESS FOR THE ACADEMIC YEAR 2017-2018**

# शैक्षणिक वर्ष २०१७-१८ साठीच्या व्यावसायिक पदविका अभ्यासकमाच्या केंद्रीभुत प्रवेश प्रक्रियेतील विविध टप्पे

१. व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांसाठी इच्छुक उमेदवारांनी प्रवेशासाठी माहिती पुस्तिका व प्रवेशकिट सुविधा केंद्रावरुन (Facilitation Centre) विकत घेणे आवश्यक आहे. त्यासाठीची सुविधा केंद्राची यादी तंत्र शिक्षण संचालनालयाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. प्रवेशकिट मधील देण्यात आलेला Application ID व Password गोपनीय ठेवावा.

२. माहिती पुस्तिका व प्रवेश किटची किंमत खुल्या प्रर्वगासाठी रु.४००/- आणि मागासवर्गीय व अपंग उमेदवारांसाठी रु.३००/- इतकी असुन त्या व्यतिरीक्त अन्य कोणतीही रक्कम माहिती पुस्तिका व प्रवेशकिटसाठी सुविधा केंद्रामध्ये देण्यात येऊ नये.

३. सुविधा केंद्रावरुन उपलब्ध करुन घेतलेली माहिती पुस्तिका उमेदवारानी पुर्णपणे वाचुन /समजुन घेणे आवश्यक आहे.

४. व्यावसायिक पदविका अभ्यासक्रमांसाठी इच्छुक उमेदवारांनी प्रवेशासाठी वेळोवेळी प्रसिध्द करण्यात येणारे प्रवेश प्रक्रीयेचे वेळापत्रक तंत्रशिक्षण संचालनालयाचे संकेत स्थळावरुन उपलब्ध करुन त्यानुसार उमेदवाराने आवश्यक कार्यवाही करावी. त्यात काही बदल केलेले असल्यास त्याचीही संकेतस्थळावरुन वेळोवेळी नोंद घेणे.

५. प्रवेशकिट वरील पासवर्ड घेऊन सुविधा केंद्रावरच्या वा स्वत: च्या संगणकावर पदविका अभ्यासक्रमांसाठीचा ऑनलाईन अर्ज खालील नमुद संकेतस्थळावरुन विहीत कालावधीत भरुन submit करणे.

| अभ्यासक्रमाचे नांव | संकेतस्थळ |
|---|---|
| पोस्ट एस.एस.सी. प्रथम वर्ष पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम | www.dtemaharashtra.gov.in/poly2017 |
| पोस्ट एच.एस.सी प्रथम वर्ष पदविका सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी, हॉटेल मॅनेजमेंट अँड कॅटरींग टेक्नॉलॉजी, औषधनिर्माणशास्त्र अभ्यासक्रम | www.dtemaharashtra.gov.in/posthscdiploma2017 |
| थेट व्दितीय वर्ष पोस्ट एस.एस.सी. पदविका अभियांत्रिकी अभ्यासक्रम | www.dtemaharashtra.gov.in/dsd2017 |

अर्ज भरताना अर्जामध्ये उमेदवाराने स्वत:चा E-mail ID व मोबाईल क्रमांक अचुक भरावा. तदनंतर भरलेल्या अर्जाची प्रिंट काढुन त्यामध्ये दर्शविलेल्या कागदपत्रांच्या छायांकित प्रती सुविधा केंद्रावर मुळ प्रमाणपत्रावरुन तपासुन घेणे व अर्ज जमा केल्याची पावती सुविधा केंद्राकडुन उपलब्ध करुन घेणे. तसेच सुविधाकेंद्रावर अर्ज confirm करण्यापुर्वी अर्जामध्ये काही

दुरुस्ती करावयाची असल्यास आवश्यक ती दुरुस्ती सुविधा केंद्रावर करुन घेणे. तपासल्यानंतर सर्व मुळ कागदपत्रे उमेदवाराने स्वत: च्या ताब्यात घ्यावीत.

६. नियोजित वेळापत्रकानुसार प्रवेशाची तात्पुरती गुणवत्ता यादी ( Provisional Merit List ) सक्षम प्राधिकरणाव्दारे प्रसिध्द करण्यात येईल. त्यामध्ये उमेदवाराने स्वत:ची माहिती काळजीपुर्वक तपासुन घेणे व त्यामध्ये काही दुरुस्ती आवश्यक असल्यास दुरुस्तीसाठीच्या आवश्यक कागदपत्रासह विहीत कालावधीत सुविधा केंद्रावर जाऊन आवश्यक दुरुस्ती करुन घेणे व दुरुस्ती नंतर confirm केलेल्या online अर्जाची print काढुन घेणे.

७. प्रवेशाची अंतिम गुणवत्ता यादी ( Final Merit List ) सक्षम प्राधिकरणाव्दारे अनुक्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या संकेतस्थळावर नियोजित वेळापत्रकानुसार प्रसिध्द केली जाईल. अंतिम गुणवत्ता यादी प्रसिध्द झाल्यानंतर यादीमध्ये कोणताही बदल केला जाणार नाही. याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.

८. सक्षम प्राधिकरणाव्दारे केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेसाठी ऑनलाईन प्रक्रीयेव्दारे एकुण तीन फे-या घेण्यात येतील.

९. प्रथम फेरीसाठी विविध संस्थामधील विविध अभ्यासक्रमांच्या उपलब्ध जागा पाहुन त्यानुसार प्रथम फेरीसाठी ऑनलाईन विकल्प ( Option ) स्वत: संगणकावर किंवा सुविधा केंद्रामध्ये जाऊन भरावा. उमेदवार विविध संस्थामधील विविध अभ्यासक्रमांचे असे एकुण १ ते ३०० ऑनलाईन विकल्प ( Option ) देऊ शकतात.

१०. त्यामध्ये विकल्पांचा पसंतीक्रम हा प्रथम प्राधान्याने उतरत्या क्रमाने भरणे आवश्यक आहे. प्रत्येक संस्थेच्या प्रत्येक अभ्यासक्रमनिहाय एक विकल्प असतो. TFWS (Tuition Fee Waiver Scheme )चा स्वतंत्र विकल्प असतो.

११. उमेदवाराने स्वत: चे Application ID व Password व्दारे लॉगीन करुन विहीत कालावधीत (प्रवेशाचे शेडयुल प्रमाणे ) ऑनलाईन विकल्प भरुन तो submit करणे त्यानंतर विकल्प पुन्हा एकदा तपासुन तदनंतरच confirm करणे व त्याची print काढुन घेणे.

१२. उमेदवाराने आपले Application ID व Password व्दारे लॉगीन करुन प्रथम फेरीसाठी वाटप (Allot) झालेला अभ्यासक्रम व संस्था ( allotted Choice code ) अनुक्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या संकेतस्थळावर पहावे. उमेदवाराला संस्था व अभ्यासक्रम वाटप (Allot) झाले असल्यास उमेदवाराने प्रवेश confirm करण्यापुर्वी अर्ज स्विकृती केद्र/स्वत: संगणकावर किंवा सुविधा केंद्रामध्ये मध्ये FREEZE /SLIDE /FLOAT **या पैकी एक पर्याय निवडणे आवश्यक आहे.**

FREEZE -चा अर्थ उमेदवारास वाटप (Allot) करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घ्यावयाचा असुन त्यापेक्षा चांगल्या पर्यायाची तो अपेक्षा ठेवत नाही. अशा प्रकारातील उमेदवार दुस-या व तिस-या फेरीकरीता पात्र असणार नाहीत.

SLIDE- चा अर्थ उमेदवारास वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घ्यावयाचा असुन फक्त त्याच संस्थेमध्ये त्या पेक्षा चांगल्या विकल्पाची जागा (अभ्यासक्रम/शाखा )मिळाल्यास तो घेणार आहे. अशा प्रकारातील विद्यार्थी दुस-या व तिस-या फेरीकरीता पात्र असतील.

FLOAT-चा अर्थ उमेदवारास वाटप करण्यात आलेल्या जागेवर प्रवेश घ्यावयाचा असुन त्यापेक्षा चांगल्या विकल्पांची जागा ( कोणत्याही संस्थेत / अभ्यासक्रम )मिळाल्यास तो घेणार आहे. अशा प्रकारातील विद्यार्थी दुस-या व तिस-या फेरीकरीता पात्र असतील.

१३. प्रवेश उपस्थिती केंद्रावर ( Admission Reporting Centre ) प्रवेश शुल्क भरुन प्रवेश निश्चिती करुन त्याची पोंच पावती (Print) घेणे. प्रवेश उपस्थिती केंद्राची यादी तंत्र शिक्षण संचालनालयाचे संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आली आहे. उमेदवाराने प्रवेश निश्चितीसाठी खुला प्रवर्ग, VJ/DT, NT, SBC/OBC प्रवर्गासाठी रु. ३०००/- व अनुसुचित जाती/ जमातीसाठी रु. १०००/- देणे आवश्यक आहे. सदर रक्कम ही ऑनलाईन पध्दतीने स्विकारली जाणार आहे, त्याची नोंद सर्व उमेदवारांनी घ्यावी.

१४. दुस-या फेरीतील शिल्लक जागा संकेत स्थळावर पाहणे. इच्छुक उमेदवार दुस-या फेरीसाठी नवीन विकल्प भरु शकतो. यामध्ये शिल्लक नसलेल्या जागांचा सुध्दा समावेश होऊ शकतो कारण दुस-या फेरीची प्रक्रीया चालु असताना काही उमेदवाराना वरचा विकल्प मिळाल्यास त्यांची रिकामी होणारी जागा नंतरच्या उमेदवारांना मिळु शकते.

१५. ज्या उमेदवारांना प्रथम फेरी मध्ये कोणतीही जागा मिळाली नाही अथवा ज्यानी प्रथम फेरीमध्ये भाग घेतला नाही. ( विकल्प अर्ज भरलेला नसल्यामुळे ) किंवा ज्यांनी मिळालेला प्रवेश घेऊन तो रद्द केला आहे किंवा जागा नाकारली आहे अथवा ज्यांनी या पुर्वी FREEZE विकल्प निवडला होता परंतु जे दुस-या फेरीमध्ये SLIDE किंवा FLOAT निवडण्यास इच्छुक आहेत असे उमेदवार दुस-या फेरीमध्ये भाग घेण्यास पात्र असतील.

१६. उमेदवाराने आपले Application ID व Password व्दारे लॉगीन करुन दुस-या फेरीसाठी वाटप (अलॉट) झालेला अभ्यासक्रम व संस्था (allotted Choice code )संकेत स्थळावरुन पहावे. दुस-या फेरीमध्ये ज्याना प्रथमच अलॉटमेंट झालेले आहे अशा उमेदवारानी अनुक्रमांक १२ व १३ प्रमाणे कार्यवाही पुर्ण करावी.

१७. तसेच ज्या उमेदवारांना या पुर्वी प्रथम फेरीमध्ये जागा वाटप झाले होते व दुस-या फेरीमध्ये नवीन चांगला पसंतीचा विकल्प मिळाला आहे अशा इच्छुक उमेदवारांनी FREEZE / SLIDE/ FLOAT **या पैकी एक पर्याय** ऑनलाईन स्वत: संगणकावर किंवा सुविधा केंद्रामध्ये जाऊन निवडणे. ज्या उमेदवारांनी प्रथम फेरीमध्ये SLIDE किंवा FLOAT हा पर्याय निवडला होता व ज्यांना वरच्या पसंतीक्रमाची त्यांच्या निवडीची जागा दुस-या फेरीमध्ये मिळाली असेल त्या उमेदवारांची प्रथम फेरीमधील स्विकारलेली जागा आपोआप रद्द होईल.

१८. तिस-या फेरीतील शिल्लक जागा संकेत स्थळावर पाहणे. इच्छुक उमेदवार तिस-या फेरीसाठी नवीन विकल्प भरु शकतो. यामध्ये शिल्लक नसलेल्या जागांचा सुध्दा समावेश होऊ शकतो कारण तिस-या फेरीची प्रक्रीया चालु असताना काही उमेदवाराना वरचा विकल्प मिळाल्यास त्यांची रिकामी होणारी जागा नंतरच्या उमेदवारांना मिळु शकते.

१९. ज्या उमेदवाराना पहील्या/दुस-या फेरीमध्ये कोणतीही जागा मिळाली नाही अथवा ज्यानी पहिल्या/दुस-या फेरीमध्ये भाग घेतला नाही ( विकल्प अर्ज भरलेला नसल्यामुळे ) किंवा ज्यांनी यापुर्वी प्रवेश घेऊन तो रद्य केला आहे किंवा जागा नाकारली आहे अथवा ज्यांनी या पुर्वी FREEZE विकल्प निवडला होता परंतु तिस-या फेरीमध्ये भाग घेण्यास इच्छुक आहेत असे उमेदवार तिस-या फेरीमध्ये भाग घेण्यास पात्र असतील.

२०. उमेदवाराने आपले Application ID व Password व्दारे लॉगीन करुन तिस-या फेरीसाठी अलॉट झालेला अभ्यासक्रम व संस्था (allotted Choice code )संकेत स्थळावरुन पहावे. तिस-या फेरीमध्ये ज्याना प्रथमच अलॉटमेंट झालेले आहे अशा उमेदवाराने संस्था व अभ्यासक्रम अलॉटमेंट झालेले असल्यास प्रवेश उपस्थिती केंद्रावर ( ARC )प्रवेश शुल्क भरुन प्रवेश निश्चिती करणे. तिस-या फेरीनंतर प्रवेशासाठी केंद्रीभुत प्रवेश प्रक्रीयेची फेरी नसल्यामुळे **FREEZE/SLIDE/FLOAT चा पर्याय उपलब्ध असणार नाही.** प्रवेश उपस्थिती केंद्रांची यादी (ARC) या संचालनालयाचे या www.dtemaharashtra.gov.in या संकेत स्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

२१. तिस-या फेरीनंतर, अलॉटमेंट झालेल्या सर्व फेरींच्या उमेदवारानी ARC मधुन प्राप्त झालेली पोच पावती (Print) घेऊन् संबधित संस्थेत विहीत कालावधीत उपस्थित राहुन संस्थेमध्ये रितसर प्रवेश शुल्क (Admission Fee) भरुन प्रवेश कायम करणे आवश्यक आहे. जागा वाटप झालेल्या संस्थेत तिस-या फेरीनंतर प्रवेश शुल्क भरुन प्रवेश निश्चित न केल्यास अशा उमेदवारांचा प्रवेश आपोआप रद्य होईल याची नोंद प्रत्येक उमेदवाराने घ्यावी.

२२. प्रवेश प्रक्रीयेच्या कालावधीमध्ये सक्षम प्राधिकरणाव्दारे घेण्यात येणा-या निर्णयाबाबत अथवा प्रवेशाच्या वेळापत्रकामध्ये तांत्रिक कारणास्तव काही बदल करण्यात आल्यास त्याची प्रसिध्दी अनुक्रमांक ५ मध्ये नमुद केलेल्या संकेत स्थळावर वेळोवळी प्रसिध्द करण्यात येईल, त्याची नोंद सर्व उमेदवारांनी घ्यावी.